महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे-४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE DI

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/ 25536712(OFF)

E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in

क्रमांक पुविमं/भांडार/919
पुणे. ४११ ००५
दिनांक: ०३/१२/२०२५

प्रति,

-----------

-----------

-----------

**विषय:-** कार्यालयीन आवारातील उपहारगृह चालविण्यास देणेसंदर्भात (सन २०२५-२०२६) दरपत्रके मागविणे बाबत....

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, या कार्यालयास खालील तपशीलप्रमाणे कार्यालयीन उपहारगृह चालविण्यासाठी दरपत्रके मागणी करण्यात येत आहेत. उपहारगृह चालविण्यास देणे संदर्भात (सन २०२५-२०२६) साठी सादर करावयाचा दरपत्रकाचा नमुना,अटी व शर्ती खालील प्रमाणे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ,पुणे -४११००५.

उपहारगृह चालविण्यास देण्याबाबत/सन २०२५-२०२६

१.ठेकेदाराचे नाव व पत्ता ------------------------------------------

२.संस्थेचें नांव व पत्ता-------------------------------------------

३.दूरध्वनी क्रमांक------------------------ भ्रमणध्वनी क्रमांक-----------

४.शॉप ॲक्ट क्रमांक-------------------

५.जीएसटी क्रमांक--------------------

६.ई-मेल आय डी क्रमांक--------------

७. पॅन कार्ड क्रमांक-----------------:

Scanned by CamScanner

# पदार्थाचे दरपत्रक

| अ.क्र. | पदार्थाचे नांव | वजन | एका प्लेटचे दर सर्व करासहित | जीएसटी |
|---|---|---|---|---|
| | **नाष्टयाचे पदार्थ** | | | |
| १. | कांदा पोहे | १०० ग्रॅम | | |
| २. | उपीट/उपम | १०० ग्रॅम | | |
| ३ | शिरा | १०० ग्रॅम | | |
| ४ | वडापाव | मध्यम आकार | | |
| ५ | भजी-कांदा भजी/गोल भजी/पालक भजी/बटाटा भजी | १०० ग्रॅम | | |
| ६ | मिसळ (मटकी इतर) | २०० ग्रॅम | | |
| ७ | इडली सांबार -सिंगल | १०० ग्रॅम | | |
| ८ | इडली सांबार -डबल | २०० ग्रॅम | | |
| ९ | बटाटे वडा सांबार- सिंगल | १०० ग्रॅम | | |
| १० | बटाटे वडा सांबार- डबल | २०० ग्रॅम | | |
| ११ | उडीद वडा सांबार- सिंगल | १०० ग्रॅम | | |
| १२ | उडीद वडा सांबार- डबल | २०० ग्रॅम | | |
| १३ | २ पाव/२ स्लाईस | मध्यम आकार | | |
| १४ | सांबार प्लेट/सांबार वाटी | १५० ग्रॅम | | |
| १५ | वडा चटनी ड्ड सिंगल | १०० ग्रॅम | | |
| १६ | वडा चटनी -डबल | २०० ग्रॅम | | |
| १७ | इडली चटणी सिंगल | १०० ग्रॅम | | |
| १८ | इडली चटणी -डबल | २०० ग्रॅम | | |
| १९ | पुरी भाजी (५ पुरी व भाजी) | ३०० ग्रॅम | | |
| २० | साबुदाणा खिचडी व चटणी | १०० ग्रॅम | | |
| २१ | साबुदाणा वडा चटणी -डबल | १५० ग्रॅम | | |
| २२ | बटाटा चिवडा पाकीट/चिप्स पाकीट | १०० ग्रॅम | | |
| | **जेवण /अल्पोपहार** | | | |
| २३. | पोळी भाजी<br>३ पोळया,सुकी भाजी,किंवा रस्सा भाजीवाटी,लोणंच,सॅलड | | | |
| २४ | राईस प्जेट<br>३ पोळया,२ वाटी वरण,भात मध्यम वाटी,२ भाज्या,(एक सुकी एक ओली)लोणंच,सॅलड. | | | |
| २५ | स्पेशल राईस प्लेट<br>४ पोळया,१ हिरवी भाजी,१सुकी भाजी,वरण भात पापड, लोणच,कोशिंबीर,१ स्वीट (गुलाबजाम/जिलेबी/श्रीखंड/आम्रखंड/बर्फी) | | | |
| २६ | वरण भात | २०० गॅम | | |
| २७ | साधा भात प्लेट | १०० गॅम | | |
| २८ | मसाला भात प्लेट | १०० गॅम | | |
| २९ | व्हेज पुलाव प्लेट | १०० गॅम | | |
| ३० | चपाती सिंगल (चांगल या दर्जाच्चा गव्हाची) | मध्यम आकार | | |
| ३१ | सुकी भाजी १ प्लेट | १०० गॅम | | |

Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३२ | रस्सा भाजी १ प्लेट | १५० ग्रॅम | | |
| | **गोड पदार्थ** | | | |
| ३३ | गूलाबजाम | १०० ग्रॅम | | |
| ३४ | जिलेबी | १०० ग्रॅम | | |
| ३५ | श्रीखंड | १०० ग्रॅम | | |
| ३६ | आम्रखंड | १०० ग्रॅम | | |
| ३७ | गोड शिरा | १०० ग्रॅम | | |
| | **पेय पदार्थ** | | | |
| ३८ | ताक | २०० मिली | | |
| ३९ | मसाला ताक | २०० मिली | | |
| ४० | लिंबू सरबत | २०० मिली | | |
| ४१ | कोकम सरबत | २०० मिली | | |
| ४२ | साधा चहा | ९० मिली | | |
| ४३ | स्पेशल चहा | ९० मिली | | |
| ४४ | कटिंग चहा | ५० मिली | | |
| ४५ | साधी कॉफी | ९० मिली | | |
| ४६ | नेस कॉफी | ९० मिली | | |
| ४७ | साधे दूध | २०० मिली | | |
| ४८ | मसाला दूध | २०० मिली | | |

थंड पेयांचे तसेच बिस्किटांच्या पुडयाचे दर कंपनी नमूद दर पेक्षा अधिक/जादा असणार नाहीत. वरील खानपान पदार्थाव्यतिरिक्त इतर पदार्थांचे दर हे चर्चा करुन ठरवून देण्यात येतील. तेव्हा वरील दराप्रमाणे मी सर्व पदार्थ देण्यास तयार असून उपहारगृह चालविण्यास देणेबाबत/२०२४-२०२५ मधील सर्व अटी मला मान्य आहेत.

## ***अटी व शर्ती***

०१. शॉप ॲक्ट नोंदणी प्रमाणपत्र सन २०२४-२०२५ नूतनीकरण केलेली सांक्षांकित प्रत.

०२. सन-२०२४-२०२५ हॉटेल व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (महसूल विभाग पुणे सक्षम अधिका-यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र आवश्यक).

०३. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.

०४. वित्तीय वर्ष-२०२२-२३,२०२३-२४,२०२४-२५ आयकर विवरण पत्र.

०५. अनुभव प्रमाणपत्र साक्षांकित छायाप्रत सरकारी,निमसरकारी,कार्यालयात कामकाज केल्याचे कार्यादेश ग्राहय धरले जाणार नाहीत

०६. आयकर नोंदणी प्रमाणपत्र (पॅन नंबर) साक्षांकित प्रत

०७. अन्न भेसळ विभाग सन २०२४-२५ नोंदणी प्रमाणपत्र.

०८. काळया यादीत समाविष्ट नसल्याबाबतचे शपथपत्र

०९. कार्यालयाकडे सध्या असलेले आवश्यक फर्निचर,गॅस कनेक्शन (गॅस सिलेंडर शिवाय)व पाणी मोफत वापरावयास मिळेल त्यामुळे पदार्थांचे दर बाजारभावापेक्षा कमी असावेत.

१०. दर मान्य झाल्यानंतर त्यामध्ये कार्यालयाची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय बदल करता येणार नाही.

दरांचा फलक उपहारगृह सुरू करावयाच्या अगोदर लावण्यात यावा. सर्व पदार्थांचे दर सोबतच्या

Scanned by CamScanner

तक्त्यात भरून निर्धारित मुदतीत देणे आवश्यक आहे.

११. कार्यालयाने दिलेल्या वस्तुपैकी काही वस्तू ठेकेदार /त्यांच्या माणसांकडून हरवल्यास अथवा मोडतोड झाल्यास त्याची पूर्ण भरपाई करून द्यावी लागेल.

१२. ठेकेदारास विद्युत वापराचे देयक दरमहा रू.४००/-भरावे लागेल. मासिक उपहारगृह विदयुत देयक म्हणून प्रत्येक महिन्याच्या १ तारखेस कार्यालयाकडे रोखीने भरून त्याची रितसर पावतीची एक प्रत भांडार शाखेकडे जमा करण्यात यावी.

१३. ठेकेदाराने पुणे विभागीय मंडळ, कार्यालयाच्या आवारातील तसेच मंडळाच्या कामानिमित्त येणारेअभ्यांगत व बँक कर्मचारी यांना वेळेवर चहा व ताजे पदार्थ पुरवावेत. सर्व पदार्थांचा दर्जा उत्तम असावा.त्यासाठी वापरले जाणारे साहित्य उदा. तेल, तूप इत्यादी दर्जेदार असावेत.

१४. उपहारगृह व किचन रूममध्ये नेहमी स्वच्छता ठेवण्याची दक्षता घेण्यात यावी. सर्व वेटर्स स्वयंपाकी वगैरेंचा गणवेश स्वच्छ व निटनेटका असला पाहिजे. तसेच कपबशी,ग्लास,प्लेट्स,चमचे इ.वापराच्या वस्तू नेहमी स्वच्छ असाव्यात.

१५. म.न.पा.यांचे निर्देशानुसार ओला व सुका कचरा वर्गीकरण करुन योग्य विल्हेवाट लावण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१६. मान्य दरपत्रकधरक यांचे पोलीस कमिशनर यांचेकडील प्रमाणपत्र स्वखर्चाने घ्यावे लागेल.(पोलीस कमिशनर यांचेकडील लायसेन्स मंडळाच्या नावाने काढावे लागेल व फ्रेम करून उपहारगृहामध्ये लावावे लागेल)

१७. उपहारगृह व किचन रूम दररोज स्वच्छ करावी लागेल.तसेच दर आठवडयास उपहारगृह व किचन रूम फिनेलने स्वच्छ करावे.कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर आरोग्यविषयक सर्व उपाययोजनाकरणे बंधनकारक राहील.(उद.हँडवॉश,सॅनीटायझर)

१८. उपहारगृहात खायचे पदार्थ पुरवठा करण्याची वेळ सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.४५ वाजेपर्यंत कार्यालयीन काम संपेपर्यत असेल कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार व सुचनेनुसार सुटटीच्या दिवशीही उपहारगृह चालू ठेवावे लागेल,उपहारगृहामध्ये फक्त पाच व्यक्तींना राहण्याची परवानगी आहे.जे कर्मचारी रात्रीउपहारगृहामध्ये झोपण्यास असतील त्यांची नावे, ओळखपत्रे व पत्ते पोलीस व्हेरिफिकेशन कार्यालयास देणे आवश्यकआहे.

१९. ठेकेदाराने उपहारगृहामध्ये तक्रार पुस्तक ठेवणे आवश्यक असून ते दर महिन्यास अथवा मागणीनुसार कार्यालयाच्या अधिका-याकडे किंवा उपहारगृह समिती सदस्यांकडे पाहणी करिता द्यावे लागेल.

२०. मंडळ अधिका-यांना व कर्मचा-यांना सकाळी ११ ते १२ व संध्याकाळी ३.३० ते ४.३० या वेळेत जागेवर चहा इ.पुरवावे लागेल,तसेच सभांच्या दिवशी सभागृहात,अतिथीगृहात चहा नाष्टा जेवण इ.त्यांच्या मागणीनुसार त्वरित पुरवावे लागेल.

२१. मान्य दरपत्रकधारक हे उपहारगृह त्याच्या व्यतिरिक्त दुस-यास चालविण्यास देता येणार नाही.तसे अधिकार दरपत्रकधारकास राहणार नाही.

२२. दरपत्रकधारक उपहारगृह चालविण्याचा पूर्वानुभव असणे आवश्यक आहे व त्याबाबत सदर संस्थांचे कामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

२३. मान्य दरपत्रकधारक महानगरपालिका आरोग्य अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र स्वखर्चाने दयावे लागेल त्याबाबत सदर संस्थेचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

२४. उपहारगृह चालविण्यासाठी एक वर्षाकरिता करारनामा करण्यात येईल,जर ठेकेदाराने उपहारगृह समाधानकारक चालविले नाही तर एक महिन्याची नोटीस देवून ठेकेदाराकडून उपहारगृह काढून घेण्यात येईल,व बयाना रक्कम व सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्यात येईल.अथवा दंडात्मक योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.याची नोंद घ्यावी.याबाबत मंडळाचा निर्णय अंतिम राहील.ठेकेदाराचे काम

Scanned by CamScanner

समाधानकारक वाटल्यास एक वर्षाची मुदतवाढ देण्याचा निर्णय मंडळाने राखून ठेवला आहे.

२५. उपहारगृह चालविण्यासाठी मासिक भाडे रू.३,०००/-(जीएसटी वगळून) भरावे लागेल. तसेच सदरहू अकरा महिन्याचे मासिक भाडे कार्यादेश दिल्यानंतर जमा करावे लागेल.

२६. रू५००/-च्या स्टँप पेपरवर मान्य मान्य दरपत्रकधारकास करारपत्र द्यावे लागेल. रू. ५००/-चा स्टँप पेपर तो टंकलिखित करुन आणावा.

२७. थंड पेयाचे दर कंपनीच्या अधिकृत विक्रीच्या छापील दरानुसारच विकण्यास परवानगी देण्यात येईल. कंपनीच्या दरांचे छापील दरपत्रक कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

२८. दरपत्रक प्रक्रियेच्या कोणत्याही स्तरावर सदर दरपत्रक प्रक्रिया रदद करण्याचा अधिकार विभागीय मंडळाने राखून ठेवले आहेत.

२९. कोणत्याही प्रकारे अन्नामधून भेसळ, विषबाधा होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल. असे प्रकार निदर्शनास आल्यास अथवा सिध्द झाल्यास प्रचलित कायदयानुसार कारवाई केली जाईल.

३०. मान्य दरपत्रकधारकास रुपये ३५,०००/-एवढी सुरक्षा ठेव राष्ट्रीयीकृत बँकेच्या धनाकर्षाद्वारे ठेवणे बंधनकारक राहील.

३२. देयकातून नियमानुसार २% आयकर रक्कम कपात करण्यात येईल शासन नियमानुसार इतर कर जसे जीएसटी या बाबतची वजाती करण्यात येईल.

३३. दरपत्रक मान्य दर करार केल्यापासून पुढील १ वर्षासाठी बंधनकारक राहतील.

३४. अटी व शर्ती असलेली दरपत्रके स्विकारली जाणार नाही.

३५. दरपत्रक स्विकारण्याची अंतिम मुदत दिनांक १८/१२/२०२५ रोजी पर्यंत राहील.

MBRaut
2.12.25

(डॉ.मिनाक्षी राऊत)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११००५.

Scanned by CamScanner